अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/२५६५
दिनांक : १७/०७/२०२०

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
कोरोना विषाणू आजाराच्या (कोवीड-१९) अनुषंगाने पी.एम.पी.एम.एल.कडील कर्मचाऱ्यांना परिमंडळ निहाय उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे जा.क्र. पी.एम.पी.एम.एल./ अेओ/७२०, दिनांक १६/०७/२०२०

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे, त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित यांचेकडून कोव्हिड प्रतिबंधक कामासाठी ४३७ कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामधील ४२७ कर्मचारी यांना सोबत जोडलेल्या यादीनुसार परिमंडळ क्र.१ ते ५ निहाय सदर सेवकांना प्रामुख्याने सर्वेक्षणाचे कामकाज द्यावे सर्वेक्षणासाठी आवश्यकता नसल्यास डॉ.वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका यांची संमती प्राप्त करूनच सदर सेवकांना अन्य कामकाज द्यावे. सदरचे सर्वेक्षणाचे काम उपलब्ध नसल्यास किंवा तात्काळ आवश्यकता नसल्यास CCC, क्वारंटाईन कक्ष व्यवस्था, आयसोलेशन कक्ष व्यवस्था, इ. कामकाज देण्यात यावे.

संबंधित कर्मचारी यांनी उप आयुक्त, परिमंडळ यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.

सदर सेवक नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या, हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

उप आयुक्त, परिमंडळ यांनी त्यांचे अधिनस्त कोरोना विषाणू आजाराच्या कामकाजाबाबत सदर सेवकांचे आदेश आपले स्तरावरून प्रसृत करावेत.

सदर कर्मचाऱ्यांची महिनेमहाची हजेरी पाठविताना कर्मचाऱ्याचे नाव, हुद्दा, क्रमांक व आगार या बाबी नमूद करून सदरची हजेरी दरमहाच्या २७ तारखे पर्यंत महामंडळाच्या admin@pmpml.org या ई-मेलवर तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे पत्राद्वारे कळवावी.

वरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल परिमंडळ कार्यालयाने उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचेकडे सादर करावेत.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत – १) मा. व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, पुणे
२) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव.